|| अल्पारंभ: क्षेमकर:||

SINGLE WINDOW SERVICES

# गवाक्ष

......एक विचारमंच !

अंक : १ वा सप्टेंबर २००६


## संपादकीय



इक्विटी म्युच्युअल फंडाचा दीर्घ काळातील परताव्याचा आढावा (संदर्भ : इकॉनॉमिक टाईम्स् मंगळवार दि. ०७ फेब्रुवारी २००६)

व्हॅल्युरिसर्च संस्थेने मागील दहा वर्षात सन १९९६ ते २००५ वर्षात इक्विटी म्युच्युअल फंडाच्या परताव्याचा आढावा घेण्यासाठी तुलनात्मक अभ्यास केला असता असे आढळून आले की, मागील दहा वर्षात गुंतवणूकदारांच्या भांडवलावर सरासरी प्रतिवर्षी १९.५ टक्के परतावा देऊन त्यांचे भांडवल सहा पटीने वाढले. वरील अभ्यासातील २८ योजनांपैकी २२ योजनांनी बीएससी सेंन्सेक्सपेक्षा जास्त परतावा दिला आहे. अभ्यासातील काही ठळक योजनांच्या परताव्याची टक्केवारी खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

''इक्विटी डायव्हर्सीफाईड योजनांच्या दहा वर्षाच्या परताव्याची तुलना''

| अ.क्र. | इक्विटी योजना | दहा वर्षातील सरासरी परतावा |
|---|---|---|
| १. | रिलायन्स ग्रोथ | ३४ |
| २. | एच.डी.एफ.सी. इक्विटी | ३३ |
| ३. | फ्रेंकलीन ब्ल्यूचिप | ३२ |
| ४. | बिर्ला सनलाईफ ९५ ☆ | ३१ |
| ५. | फ्रेंकलिन प्राईमा | ३० |
| ६. | फ्रेंकलिन प्राईमा प्लस | ३० |
| ७. | रिलायन्स व्हिजन | २९ |
| ८. | बिर्ला एडव्हांटेज | २८ |
| ९. | एचडीएफसी प्रूडन्स ☆ | २८ |
| १०. | मॅग्नम टॅक्सगेन | २६ |

☆ वरील योजनापैकी बिर्लासनलाईफ ९५ व एचडीएफसी प्रूडन्स ह्या दोन योजना बॅलेन्सड् (इक्विटी + कर्जरोखे) असूनही त्यांचे परतावे इक्विटी योजनासारखेच आहेत.

सदरहू अभ्यासातील काही निकृष्ट दर्जाच्या योजनांचा जाता जाता गुंतवणूकदाराच्या माहितीसाठी उल्लेख करावासा वाटतो -

१. एलआयसी ग्रोथ
२. एलआयसी इक्विटी
३. टॉरस डिस्कव्हरी स्टॉक
४. यूटीआय मास्टर शेअर

गुंतवणूकदारांनी वरील अभ्यासाचे काळजीपूर्वक चिंतन करून गुंतवणूक करताना उत्तम दर्जाच्या योजनांमध्येच दीर्घकालीन गुंतवणूक करावी. एकरकमी सिस्टिमेटिक इन्व्हेस्टमेंट योजना (SIP) अंमलात आणून भांडवल वृद्धि करीत रहावे.

भांडवल वृद्धिसाठी तज्ञांचे विचार मांडावेसे वाटतात.

❖. When you sell in desperation, you always sell cheap.

❖ Time is vital. It is much more important to buy cheap than to sell dear.

❖ The definition of a great company is one that will remain great for many years.

गुंतवणूक करत असतांना अर्थातच आयुर्विमा, अपघाती विमा व आरोग्य विमा (Mediclaim) या प्राथमिक गरजांकडे दुर्लक्ष करू नये.

आपला
रघुवीर अधिकारी
CEO, SWS.

## अर्थ ''प्रॉपटीचे''

'सामान्य भाषेत कायदा'' या शिर्षकाखाली कायद्याच्या संदर्भातील अर्थ सामान्य भाषेत जाणून किंवा समजून घेणे असा हेतू आहे. ''कायदा'' हा विषयच मुळात मोठा. प्रत्येक गोष्टीसाठी वा समस्येसाठी स्वतंत्र ''ॲक्ट'' आहे असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. मनुष्यप्राणी, हवामान, पर्यावरण, समाज या व यासारख्या सर्व गोष्टींसाठी कुठेतरी कायदा असतोच. म्हणजेच आपल्या जीवनाशी निगडीत अनेक गोष्टीसाठी कुठेतरी कायदा आहेच. उदा - लग्न-लग्नसंबंध त्या संदर्भाने येणाऱ्या जबाबदाऱ्या, कुटुंब-त्या संबंधीत जबाबदाऱ्या, समाज - सामाजिक वर्तन, शिक्षण - त्याचे हक्क - हक्कांची पायमल्ली अशा अनेक बाबीत वेळ आली की कायद्याचा आधार अपरिहार्यपणे घ्यावा लागतो.

या सर्वांशी विशेषत: मनुष्यप्राण्याच्या जीवनाशी अपरिहार्यपणे चिकटलेली गोष्ट म्हणजे ''प्रॉपर्टी.'' अनेक शब्दांचे अर्थ आपण वाटेल तसे/सोयीस्करपणे घेत असतो. बरेचदा ते त्याच्या कायद्याच्या आणि आपल्या सामान्य परिभाषेच्या समरूप असतात. म्हणजे एका ठराविक

आमच्या मुक्तांगण या व्यासपीठातर्फे दर शनिवारी संध्याकाळी ६ ते ७ या वेळेमध्ये विविध विषयांवरील चर्चासत्रे आयोजित केली जातात.

गुंतवणूक न करता हळूहळू टप्प्याटप्प्याने म्हणजेच

इच्छुक व्यक्तींनी मोबाईल नं. ९८२२३३१०७५ वर संपर्क साधावा.

SINGLE WINDOW SERVICES

*Most people mistake the limit to their vision for the limit of the world*

''गृहितकाने'' अर्थ घेतलेले असतात. पण यदाकदाचित् खरंच कोर्ट-कचेरीची वेळ आली की त्याचे अर्थ बदलतात. त्याची व्याख्या त्या ठराविक कायद्याच्या चौकटीत वेगळी असते याची आपल्याला जाणीव होते. त्यासाठी काही महत्त्वाच्या शंकांचे अर्थ या सुरवातीच्या लेखातून चर्चेस घेवू. उदा. प्रॉपर्टी, फॅमिली, नॉमिनेशन इ. शब्द इंग्रजीतून - मराठीत चपखल बसलेले आहेत. यातील ''प्रॉपर्टी'' या शब्दाचे विविध संदर्भातील अर्थ समजून घेतले तर त्याचा आवाका समजेल. अगदी अडाणी व्यक्ती सुद्धा प्रॉपर्टी हा शब्द किती सहजपणे वापरते हे आपण पाहतोच. आपल्या दैनंदिन व्यवहारांत प्रॉपर्टी ही अनेक अर्थाने येते. पैसा, घरदार, किंबहूना मुलं ही सुद्धा प्रॉपर्टीच मानली जाते. या प्रॉपर्टीच्या व्यवहारावर, त्याच्या सजगतेवर, जागरूकतेवर आपल्या आयुष्याची इमारत उभी असते. तेव्हा सहज वाटेल पण कायद्याने "Property" या शब्दाच्या घेतलेल्या अर्थांचा उहापोह करून जरा या शब्दाचा विचार गांभिर्याने करू.

"Property" या शब्दाचा साधा अर्थ ''संपत्ती'', संपत्ती म्हणजेच ''मिळकत''. ही मिळकत म्हणजे अशी संपत्ती की जी वापरण्याचा, उपयोग करण्याचा, हस्तांतरीत करण्याचा अथवा तिची मन मानेल तशी विल्हेवाट लाववण्याचा हक्क ती धारण करणाऱ्याला आहे. त्याला त्या अधिकारांत कोणतीही बाधा नाही. इथे ''धारणशक्ती'' म्हणजेच "Holder" त्या संपत्तीचा रुढार्थाने ''मालक''. म्हणजे ती संपत्ती किंवा "Property" त्याच्या मालकीची असते. त्याच्या मालकीहक्कावर कुणासही हरकत नसते. अनेकदा ही ''प्रॉपर्टी'' ''कब्जात'' म्हणजेच "Physical Possession" मध्ये असणेच गरजेचे असते असे नाही. म्हणजेच बरेच वेळा ''प्रॉपर्टी'' ही दस्तऐवजाने मालकी हक्क असलेली असू शकते. उदा (ज्याचे आपण पुढे सविस्तर विचार करू असे दस्त) खरेदीखत, बक्षीसपत्र इत्यादी. म्हणजेच असे दस्तऐवज धारणकर्त्याचे ''मालकी हक्क'' दर्शवत असतात, अथवा प्रस्थापीत करू शकतात. ''प्रॉपर्टी'' या शब्दांची व्याख्या प्रत्येक कायद्यात त्याला अनुसरून केली आहे. उदा "Transfer of Property Act, Insolvency Act, Income Tax Act" इत्यादी.

एखाद्या व्यवसायातून मिळणारे उत्पन्न ''नफा'' सुद्धा "Property" याच सदरात मोडते. "Money" म्हणजे ''पैसा' म्हणजे प्रॉपर्टी. एखाद्या व्यवसायातील ''भागीदारी भांडवल'' ही सुद्धा त्यांची प्रॉपर्टीच असते. Transfer of Property act अन्वये ''प्रॉपर्टी''म्हणजे Right to enjoy, possess, sell to make a gift, and right to transfer of debt. अशी मिळकत.

हिन्दु-लॉ अन्वये प्रॉपर्टी ही "Real self acquire " आणि ancestral म्हणजेच वडिलोपार्जित अशी सांगितली

property, ancestral म्हणजे वडिलोपार्जित आणि self acquired म्हणजेच स्वकष्टार्जित असे मुख्यत्वाने प्रकार दिसतात. यातील joint family property म्हणजे एकत्रीत कुटुंबाची मिळकत असा साधा अर्थ होतो. परंतु HUF म्हणजेच Hindu - undivided family म्हणजेच हिंदु अविभक्त कुटुंब असा अर्थ होतो. वरवर दोन्ही अर्थ सारखे वाटत असले तरी त्यात फरक आहे. या पेक्षाही ''वडिलोपार्जित मिळकत'' याचाही अर्थ थोडा वेगळा पण वरवर सारखा वाटणारा. ''वडिलोपार्जित'' म्हणजेच वडिलांनी अर्जित केलेली; यांत वडिलांपासून मुलांपर्यंत आलेली असा साधा अर्थ. म्हणजेच यांत वडिल, वडिलांचे वडिल (आजोबा) व वडिलांच्या वडिलांचे वडिल (पणजोबा) असा वडिलांकडून आलेल्या तीन पिढ्यांच्या प्रॉपर्टीचा समावेश होतो.

मात्र Self Acquired म्हणजेच ''स्वकष्टार्जित मिळकत'' ही पूर्णपणे भिन्न असते. साध्या व सोप्या शब्दात एखाद्या व्यक्तीने ''स्वकष्टाने मिळविलेली मिळकत म्हणजे स्वकष्टार्जित मिळकत/ Property" असते. अशा मिळकतीवर त्या व्यक्तीच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या अगदी मुलांचासुद्धा अधिकार नसतो. ती मिळवणाऱ्या व्यक्तीला ती मिळकत वाटेल तशी विल्हेवाट लावण्याचा, दानधर्म करण्याचा सर्व हक्क त्या मिळकतीसाठी असतो. उदा. एखाद्या वडिलांनी अशी मिळकत आपल्या मुलांना न देता एखाद्या अनाथाश्रमाला, तत्सम संस्थेला देण्याचे ठरवले तर मुलं त्याला 'वारस' म्हणून चॅलेंज करू शकणार नाही. म्हणजेच Self Acquired Property चा absolute owner तो मिळवणारा. अर्थात ''वारस'' कोण, कसा, त्याचे हक्क, वारसहक्क इ. बाबींचा "Property" च्या संदर्भात स्वतंत्र लेखाद्वारे पुढे विचार करूच.

मात्र 'वडिलोपार्जित' मिळकतीची मालमत्ता विचारांत घेतांना ''वारसदारांचा'' विचार करावाच लागतो. परंतु ''वडिलोपार्जित'' मालमत्तेशिवाय एखादी व्यक्ती स्वकष्टार्जित मिळकत धारण करू शकते. त्यात कोणतीही अडचण नसते.

''प्रॉपर्टी'' चा उल्लेख करतांना ठळक अर्थाने आणखी दोन शब्द पुढे येतात ते Movable Property आणि Immovable property म्हणजेच चल आणि अचल संपत्ती. रूढार्थाने चल संपत्ती म्हणजे जी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता येते. म्हणजे Cash, Gold, Jwellery इ. मात्र अचल संपत्ती जी जागेवरून आणि जमिनीतून हलवता येत नाही. म्हणजे "Attached to earth, Land किंवा त्यायोगे येणारे Profits इत्यादी. येथे land म्हणजे जमीन याचा अर्थ Portion of earth म्हणजे जमिनीचा तुकडा /भाग असा होतो. यांत तळे, सरोवर, नद्या (त्यांच्या सीमेत) आणि त्यापासून मिळणारे फायदे म्हणजे (सरोवरातील मासे)

आहे. हिन्दु लॉ तील संदर्भानुसार प्रॉपर्टीच Joint family त

असाही होवू शकेल. म्हणजेच Attached to earth याचा अर्थ